महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग,बेलार्ड इस्टेट,मुंबई ४०० ००१.
ई-मेल- ad.admin@mahakosh.in
दुरध्वनी क्रमांक. ०२२-२२६२२०२९/३६ संकेतस्थळ – www.mahakosh.in

---

संदर्भ- १. शासन आदेश क्र. संलेको २०१८/प्र.क्र.११३/कोषा प्रशा-२/मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. २०.०७.२०१८
२. वित्त विभाग शासन आदेश क्र. संलेको-२०१८/प्र.क्र.७२/कोषा प्रशा-२/मंत्रालय,मुंबई , दि. ३०.०७.२०१८

---

क्र. संलेको/प्रशा राप/एकतर्फी कार्यमुक्त आदेश/ कार्या-४/१०.२०१८/ 930 दि. 19 OCT 2018

**विषय :- प्रशासकीय बदली/ विनंती बदली झालेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) लेखाधिकारी संवर्गातील अधिका-यांना त्यांच्या बदलीच्या पदावर हजर होण्यासाठी संचालनालय, लेखा व कोषागारे,मुंबई स्तरावरुन एकतर्फी कार्यमुक्त करणेबाबत.**

## आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) लेखाधिकारी संवर्गातील संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये खालील विवरणपत्रात नमुद अधिका-यांची विनंती बदली करण्यात आलेली आहे. सदर अधिका-यांना संबंधित नियंत्रक अधिका-यांनी अद्यापपर्यत त्यांच्या बदलीच्या पदावर हजर होण्याकरिता कार्यमुक्त केलेले नाही. अशा अधिका-यांना संदर्भ क्र २ वरील शासन आदेशाव्दारे संचालक, लेखा व कोषागारे यांना त्यांच्या स्तरावर एकतर्फी कार्यमुक्त करण्यास प्राधिकृत करण्यात आलेले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.१ वरील आदेशान्वये बदली झालेल्या खाली नमुद अधिका-यांना बदलीच्या पदावर रुजु होण्याकरिता दिनांक २०.१०.२०१८ रोजी (म.नं) पासुन संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई स्तरावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आल्याचे समजण्यात यावे.

| अ.क्र. | संदर्भ क्र २ च्या बदली आदेशातील अ.क्र. | बदली झालेल्या लेखा अधिका-याचे नाव पदनाम व कार्यरत कार्यालय | बदली करण्यात आलेले पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | ३ | श्री. शैलेंद्र दिनकर गोसावी, लेखा अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, भंडारा. | लेखा अधिकारी, सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, धुळे. |

सदरचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन तात्काळ अंमलात येतील. या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांनी आपले रुजु अहवाल (ad.admin@mahakosh.in) संचालनालयास सादर न केल्यास त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक प्रशासकीय कार्यवाही सुरु करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. पुढील उचित कार्यवाहीसाठी या संकेतस्थळावरील आदेश ग्राहय धरण्यात यावेत.

( ज. र. मेनन )
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सविनय सादर-

१. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, भंडारा.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, धुळे.